गुलाब-वाटिका - १६

श्रीगुलाबरावमहाराज प्रतिपादित

हिंदूंची इतिहास दृष्टी ..१

श्रीगुलाबराव महाराज जीवनशताब्दी प्रकाशन

२०-९-२०१५

डॉ. कृष्ण माधव

रु.१०

** संपर्क : नारायण मोहोड ०९८२२४४०९५१*
श्रीगुलाबरावमहाराज-ट्रस्ट, आळंदी-देवाची, जि.पुणे.

(२)

१.कालचक्र (५)
२.हिंदु संस्कृतीचे विश्वव्यापकत्व (१०)
३.आंधळे आणि हत्ती (१३)
४.पारतंत्र्याचा शाप (१७)
५.इतिहास दृष्टी (१९)
६.आय विट्नेसच्या मर्यादा (२१)
७.ऐतिहासिक विकासवाद (२५)
८.इतिहास कोणी व कसा लिहावा?(२७)
९.इतिहासावर विश्वास? (३०)
१०.इतिहासाचे ३ प्रकार (३३)
११.इतिहासाच्या-मर्यादा (३८)
१२.'आर्य' अर्थाची तोडफोड (३९)
१३.आर्य = सुसंस्कृत मानव (४०)
१४.चार कसोट्या (४२)
१५.दास आर्य होत असत (४३)
१६.काळे आर्य (४५)
१७.शूद्रांना ऋषित्वाची प्राप्ती (४५)
१८.देशक्षोभकारक उपपत्ती (४६)
१९.पूर्वी सर्वच आर्य होते (४७)

(३)

श्रीगुलाबरावमहाराज : जीवनकार्य

(इ.स.१८८१ ते १९१५)

''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड.चवथ्या महिन्यात नेत्रहीन, माधान-खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्यामुळे ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

(४)

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे.तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी नवीन शब्दयोजना सुचवून शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त जगापुढे मांडला.आणि आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्यासाठी समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतां हाती दिले. ०००

युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे.

संपर्क : श्रीरंग घटाटे. बोलेपेट्रोलपंप, अमरावतीरोड, सिव्हिल लाइन नागपूर ४०००१.
टे-९३७२५२९७७० / ०७१२-२५३३९९७

१...हिंदूंची इतिहास दृष्टी.-

१.कालचक्र

सृष्टीच्या आरंभापासून आजपर्यंतचा सांस्कृतिक बदल

* अडीच हजार वर्षापूर्वी- प्राचीन काळी सर्व जगात एकच वैदिक आर्य संस्कृती व्यापून होती. सर्वत्र **प्रकाशयुग** होते. पुढे मात्र-

* कालचक्रानुसार भारत सोडून इतरत्र सर्व जगात संस्कारलोप झाला. विद्यांचे अध्ययन-अध्यापन बंद झाले. नानाविध ज्ञानशाखा विस्मृत झाल्या. त्यामुळे अधोगती होता होता युरोप वगैरे देश तर अगदी रानटी अवस्थेपर्यंत पोहचले. आणि तेथे अज्ञानाचे **अंधःकारयुग** आले. पण -

* याच काळात मानवी वंशाच्या सुदैवाने भारतातील सांस्कृतिक परंपरा तमोयुगातही टिकून राहिल्या. त्यामुळे -

कालचक्र तक्ता

काल	भारतात	विदेशात
सृष्टि-उत्पत्ति पासून आरंभ	वेदकाल प्रकाशयुग	वेदकाल प्रकाशयुग
कलिवर्ष २५०० पर्यंत	पौराणिक काल प्रकाशयुग	संस्कारलोपामुळे आर्यपरंपरांचा लोप अंधःकारयुग
कलिवर्ष २५०० नंतर	सर्व जगाला ज्ञानविज्ञान दिले प्रकाशयुगाच्या अस्ताचा आरंभ	भारतकडून पुनः शास्त्राध्ययनाला आरंभ धूसर युग
कलिवर्ष ४००० नंतर	परकीय आक्रमण, विज्ञानपरंपरा खंडित पण वेद व अध्यात्म कायम धूसर युग	विज्ञानवादाच्या प्रभावाने भौतिकतेत वाढ, विज्ञानयुग
कलिवर्ष ४९०० से आरंभ (इ.स. १८००)	इंग्रजांकडून भारतीय परंपरांची विकृती भौतिकतेत वाढ विज्ञानयुगाचा आरंभ	भारताकडून जगाला संस्कृत-अध्यात्म-योगादि शिक्षण आरंभ
कलिवर्ष ५०००	अध्यात्माकडून भोगवादाकडे वाटचाल पतन	भोगवादाकडून अध्यात्माकडे वाटचाल उन्नति

* अरबी, इजिप्ती वगैरे देशातील विद्वानांनी भारतातील ज्ञानविज्ञानांचे प्रवाह आपापल्या देशात नेले. आणि त्यांचा युरोपापर्यंत पुन्हा !!विस्तार झाला. म्हणूनच -

''भारतातून आम्हाला धर्म मिळाला, तत्वज्ञान मिळाले, वैद्यकशास्त्र मिळाले, इतकेच नव्हे तर सर्व ज्ञानशाखांना पायाभूत असलेली, व्यवहारात क्षणोक्षणी उपयोगी असलेली गणितातील 'शून्याची संकल्पना' मिळाली.'' वगैरे उद्‌गार पाश्चात्य पंडितांनी मोठ्या आदराने काढले.

जसे आज गणित-विज्ञान-वैद्यकादि आधुनिक शास्त्रे मूळात भारतीय असूनही **''इंग्रजांनी ती भारतात आणली''** असे आपण समजतो; त्याचप्रमाणे - पाश्चात्य आणि पौर्वात्य जगात हजारो वर्षापूर्वी वैदिक संस्कृती पसरली होती तरी - तिच्या आत्यंतिक विस्मृतीमुळे **''भारतापासून ती शास्त्रे आम्हाला मिळाली''** असे पाश्चात्य पंडितांना वाटल्यास त्यात नवल नाही.

* त्यानंतरच्या काळात भारतही निस्तेज होऊ

लागला. शास्त्राध्ययनाच्या परंपरा (विशेषतः विज्ञानाचे मूळ असलेल्या वैशेषिक दर्शनातील प्रत्यक्ष खंडादि.) खंडित झाल्या. जुने अवशेष केवळ ग्रंथरूपाने शिल्लक राहिले. - पण त्याच काळात **इस्लामिक नरपशूंचे आक्रमण** झाले. त्यांनी नालंदा, तक्षशीला वगैरे अनेक विशाल ग्रंथालयातील, हजारोच नव्हे तर लक्षावधि ग्रंथांची होळी केली. त्यामुळे भारतावरही **अज्ञानयुगाचे घोर सावट** पडले.

* परंतु त्याही काळात साधुसंतांनी आणि विद्वानांनी जोपासना केल्यामुळे **अध्यात्म आणि वेदपरंपरा मात्र कशाबशा टिकून राहिल्या.**

* पुढे या देशात इंग्रज आले. त्यांनी युरोपातील वैज्ञानिक सुधारणा, तत्वज्ञान, वैद्यकशास्त्र, गणित, खगोलशास्त्र वगैरे आधुनिक विज्ञान भारताला शिकविले. -- पण या साऱ्या ज्ञानशाखांचे मूळ भारतीय आहे याची जाणीव दोघांनाही नव्हती.

* एकूण काय तर भारतातून पूर्वी बाहेर गेलेल्या विद्यांचे माहेरघरी **पुनरागमन** झाले आणि **शिष्याकडून**

शिकण्याचा लाजिरवाणा प्रसंग गुरूवर म्हणजे भारतावर ओढवला.

यात भाग्याची गोष्ट एवढीच की, आपल्या पूर्वजांनी वैदिक परंपरा पूर्णतः विस्मृत होऊ दिल्या नाहीत. कोणी ना कोणी महापुरुष निर्माण होतात आणि सारे जीवन खर्ची घालून एकेक ज्ञानशाखा जिवंत ठेवतात. त्यामुळे आजच्या मतामतांच्या गलबल्यातही प्राचीन वैभवाच्या आणि ज्ञानसंपन्नतेच्या सुवर्णस्मृती कायम आहेत.

पू.गुरुजी गोळवलकरांच्या भूमिकेतून सांगावयाचे म्हटले म्हणजे - **''सत्प्रवृत्तीची बीजे कायम राखण्याचे हे ईश्वरी कार्य आहे''**

अन् त्या बीजभूत सामर्थ्यातूनच **भोगप्रधान असलेली आसुरी संस्कृती** बाजूला सारली जाऊन, प्राचीन आर्यांची **त्यागप्रधान वैदिक संस्कृतीची** विजयपताका साऱ्या जगात पुन्हा डौलाने फडकेल.

''कृण्वन्तो विश्वमार्यम्'' ही ऋषींची प्रतिज्ञा पूर्ण होईल.

''पृथिव्यै समुद्रपर्यन्ता एक राट्'' - समुद्रवलयांकित सर्व पृथ्वी एका राष्ट्राप्रमाणे एकरस होईल. सत्प्रवृत्त, अध्यात्मप्रवण आणि वैभवसंपन्न अशी सत्य- युगातील आद्य मानवांची संस्कृती पुनः येईल.

श्रीगुलाबराव महाराजांचे मार्मिक उद्‌गार -

''दुसरीकडे कितीहि जड सुधारणा झाली तरी तिचा जेव्हा कंटाळा येईल तेव्हा सर्वांना शांति आर्यावर्तातच मिळेल. आणि याचमुळे आर्यदेश टिकला आहे आणि टिकेल.''

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परे जडो । मैत्र जीवाचे ।।
दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जो वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।
-ज्ञानेश्वरी ।।

२.हिंदु संस्कृतीचे विश्वव्यापकत्व

प्राचीन काळी भारतात आणि भारताबाहेर सर्व जगात एकच विश्वव्यापिनी संस्कृती होती - ती म्हणजे वैदिक आर्य संस्कृती ! परंतु प्रचंड संहारकारी काळाच्या ओघामध्ये सुसंस्कृत समाज असंस्कृत होतात, असंस्कृत समाज प्रगती करतात, नगरांचे ठिकाणी जंगले होतात आणि जंगलांचे ठिकाणी नागरी वसाहती येतात. असे हे कालचक्र सतत चालू आहे आणि चालूच राहणार !

आज सर्व जगात होत असलेल्या उत्खननात प्राचीन संस्कृतीचे अवशेष सापडत आहेत. आणि त्या सर्वांचा प्राचीन वैदिक संस्कृतीशी अगदी जवळचा संबंध आहे. इतकेच नव्हे तर ते सारे एका वैदिक संस्कृतीचेच अवशेष आहेत असे म्हणण्याची पाळी संशोधकांवर आली आहे. पण आपण भारतीय लोक न्यूनगंडाने ग्रासलेले आहोत म्हणून ते संशोधन मोकळ्या मनाने सत्य म्हणून स्वीकारण्यास आपण अजूनही तयार होत नाही.

आपल्या प्राचीन भारतीय इतिहासाच्या बाबतीत ख्रिस्ती मिशनरी आणि ब्रिटीश राज्यकर्ते यांनी मिळून आपल्या पूर्वजांचा इतिहास विकृत करून शिकविला. केवळ **पराभवाचा इतिहास शिकविला** आणि त्याचे फलित म्हणून सारा हिंदु समाज इन्फेरियॉरिटी कॉंप्लेक्सने- न्यूनगंडाने ग्रासला गेला. मॅक्समूलरने निर्माण केलेली कपोलकल्पित ''आर्यवंश'' ही संज्ञा आपण ग्राह्य ठरविली. आणि त्याला अनुसरून-

* आर्यवंशाचे लोक आक्रमक म्हणून भारतात आले.
* भारतातील मूळ आदिवासींचा त्यांनी संहार केला.
* त्यांना गुलाम केले.
* शूद्र म्हणून सेवा करण्यात राबविले -

अशी इतिहासदृष्टीने पूर्णपणे चूक असलेली मते, सिद्धांन्त म्हणून प्राथमिक शाळेपासून एम.ए.पर्यंत इतिहास म्हणून शिकविली जातात. त्यामुळे आर्य-अनार्य, उत्तर-दक्षिण, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उच्चवर्णी-पददलित, आक्रमक-आदिवासी वगैरे फूट पाडणारे भयानक वाद भारतीय समाजात निर्माण होऊन

आज अनर्थ होऊ पाहत आहे. हा अनर्थ टाळण्यासाठी- त्याची तीव्रता कमी करण्यासाठी सत्य इतिहासाची कास धरून नीरक्षीर विवेक करण्याची गरज आहे.

वस्तुतः पाहिले तर सर्व जगातील विखुरलेले प्राचीन युगातील अवशेष एका वैदिक संस्कृतीचेच आहेत, हे सर्वांनाच मान्य करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. परंतु त्यावरून निष्कर्ष काढताना मात्र आपापल्या भावना आणि पूर्वग्रहदूषित मते यांच्या प्रभावाखाली येऊन वेगवेगळे काल्पनिक निष्कर्ष इतिहास म्हणून मांडल्या गेलेत.

* युरोपियन पंडितांनी युरोपातील काही आर्यांचे मूळ स्थान मानले.
* रशियन पंडितांनी कास्पियन समुद्राजवळील गवताळ प्रदेश हा आर्यांचे मूळ वसतिस्थान ठरविले.
* मॅक्स्मूलरने पामीरचे पठार हेच मूळस्थान गृहीत धरले
* लोकमान्य टिळकांनी उत्तर ध्रुवावरील भौगोलिक व खगोलशास्त्रीय वैदिक संदर्भांच्या उल्लेखांमुळे उत्तर ध्रुवाला आर्यांचे मूळ स्थान मानले. आणि -

* जगात इतरत्र जसे जसे अवशेष मिळत गेले तसे तसे आर्यांचे भारतात येण्याचे मार्ग युरोपियनांनी कल्पिले.
* याला उत्तर पक्ष म्हणून देशभक्तांनी भारतातून आर्य बाहेर गेलेत असे मांडले. त्या गमनागमन मार्गांचे टप्पे म्हणून दोघांनीही त्या एकच असलेल्या प्राचीन अवशेषांवर भिस्त ठेवली. परंतु -

१ - भारतातून आर्य बाहेर जाणे आणि

२ - बाहेरून आर्यांनी भारतात येणे.

ही दोन्ही मते बरोबर नसून एकांगी आहेत. आर्यांच्या विश्वव्यापक संस्कृतीचा व्यापक सिद्धांन्त सत्याला धरून आहे. आणि तो सिद्धान्त श्री गुलाबराव महाराजांनी मांडला. यावरून एक गोष्ट आठवते-

<u>३.आंधळे आणि हत्ती</u>

काही आंधळ्यांना एक हत्ती सापडला. एकाने सोंड धरली व हत्ती सापासारखा असतो हे सांगितले. दुसऱ्या आंधळ्याने पायाला चाचपडून पाहिले व हत्ती खांबासारखा असतो असे ठरविले. तिसऱ्याने हत्तीच्या पोटाला स्पर्श करून तो भिंतीसारखा असतो असे

विधान केले. कानाला हात लावून चवथ्याने हत्तीला सुपासारखे ठरविले. याप्रमाणे प्रत्येक आंधळा हत्तीचे वर्णन करू लागला. आणि शेवटी ते सर्व मिळून परस्पर भांडू लागले. त्यांचे भांडण पाहून एक डोळस माणूस आला व त्याने सर्वांना शांत केले. तो म्हणाला - ''तुमचे प्रत्येकाचे म्हणणे अगदी बरोबर आहे परंतु एकांगी आहे. हत्तीची सोंड सापासारखी आहे, पाय खांबासारखे आहे हे सारे खरेच आहे परंतु हे सर्व वर्णन पूर्ण हत्तीचे नसून एकेका अवयवाचे आहे. ते सर्व अवयव मिळूनच हत्तीचे वास्तव वर्णन होईल.''

या उदाहरणाप्रमाणे आर्य युरोपात होते, उत्तर ध्रुवावर होते, रशियात होते, अमेरिकेत होते, चीन जपानमध्ये होते, सैबेरियात होते. आस्ट्रेलियातही होते. परंतु ''त्याचवेळी आर्य भारतात मात्र नव्हते हे म्हणणे मात्र बरोबर नाही.'' सर्व जगात आर्य संस्कृती पसरली होती त्याचवेळी भारतातही तीच संस्कृती होती. हा झाला विश्वव्यापक आर्यसंस्कृतीचा सिद्धांत आणि तो दाखवून दिला आहे समन्वयमहर्षी श्री गुलाबरावमहाराज

यांनी ! चर्मचक्षू असलेल्या पंडितांनी एकांगी मते मांडली आणि चर्मचक्षू नसलेल्या महाराजांनी विश्वव्यापक आर्यसंस्कृतीच्या ऐतिहासिक वास्तवाला स्पष्ट करणारा सिद्धांत महाभारत, पुराणे व स्मृती यांच्या आधाराने मांडला. आणि त्या सिद्धान्ताला पोषक अशी उत्खनने व पुरावे आजतागायत नवे नवे उपलब्ध होत आहेत. या विश्वव्यापक सिद्धान्तानुसार पाहिले असता -

१) आर्य हा वंश नाही.
२) शूद्रवर्ण आर्यांचाच एक भाग आहे.
३) आर्यवंश भारताबाहेरून भारतात आलेला नाही.
४) भारतातून आर्यवंशाचे लोक बाहेर गेले, असेही नाही.

५) आर्यांची वैदिक संस्कृती सर्व विश्वात प्राचीन काळी- ३००० वर्षांपूर्वीच्या काळात पसरलेली होती.

ह्या महत्वाच्या पाच गोष्टी सिद्ध होतात. **डॉ. आंबेडकरांनी** सुद्धा पहिले तीन मुद्दे ''शूद्र पूर्वी कोण होते?'' या पुस्तकात उत्तम रीतीने सिद्ध केलेले आहेत. हेही अतिशय महत्वाचे आहे. वैदिक ऋषींची ''आम्ही

सर्व जगाला सुसंस्कृत करणारे आहोत- **कृण्वन्तो विश्वमार्यम् ।** ही वैदिक धारणा वस्तुस्थितीला धरून होती. वैदिक ऋषी एका भारताचेच रहिवाशी नसून सर्व जगातील निरनिराळ्या वंशातील होते.

* कश्यपऋषींचा कास्पियन समुद्राजवळ आश्रम होता.
* वसिष्ठ आसामातील होते.
* पाणिनी काश्मिरी होते.
* अगस्ति दक्षिण भारतात होते.
* शुक्राचार्य बलिराजाच्या इजिप्त वगैरेत पसरलेल्या साम्राज्यात होते.

याप्रमाणे सर्व जगात वैदिक ऋषी सर्व मानवांना संस्कारसंपन्न करीत असत. परंतु पुढे **संस्कारलोप** झाल्यामुळे सर्व जगातली आर्यसंस्कृतीही लोप पावत गेली आणि शेवटी आज केवळ भारतापुरती संकोचित होऊन राहिली आहे. आणि ती सुद्धा अधोगतीस जात आहे. त्यागप्रधान आर्यसंस्कृती लोप पावून भोगप्रधान आसुरी संस्कृतीचा झपाट्याने विस्तार होत आहे. याला पायबंद घालण्यासाठी सर्व सत्प्रवृत्त संघटनांनी संस्थांनी

आणि व्यक्तींनी सामूहिक आणि व्यक्तिशः प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. व्यक्तिगत प्रयत्नांनी स्वतःची उन्नती करावी आणि सामूहिक प्रयत्नांनी समाजाची उन्नती करावी. भोगाकडून त्यागाकडे - स्वहिताकडून परहिताकडे - आणि शेवटी नराचा नारायण होण्यासाठी पुनः एकदा वैदिक ऋषींच्या **'कृण्वन्तो विश्वमार्यम्'**ची आठवण ठेवून तिच्या परिपूर्तीसाठी कटिबद्ध होण्याची आज गरज आहे.

४.पारतंत्र्याचा शाप

कोणत्याही समाजाला पारतंत्र्य हा फार मोठा अभिशाप आहे. दुर्देवाने आपल्या भारतावर दीड हजार वर्षापासून गुलामगिरीचे सावट पसरले आहे. पैकी मुसलमानी आक्रमणाने राजकीय हानी झाली आणि भारतीय समाजाची उदार आणि व्यापक मनोवृत्ति संकोच पावली; परंतु नंतरच्या इंग्रजी गुलामगिरीने मात्र भारतीयांच्या अस्मितेलाच जबर हादरा बसला. त्यामुळे तत्त्वज्ञान- गणित- विज्ञान- काव्य- आयुर्वेद- साहित्य- कला- क्रीडा वगैरे **सर्वच क्षेत्रात आपण पराभूत**

आहोत, कमी आहोत; आणि जेते युरोपियन सर्वच बाबतीत श्रेष्ठ आहेत असा समज निर्माण झाला. त्याचबरोबर भारतीय मनावरील प्राचीन श्रेष्ठत्वाचे सर्व संस्कार पुसून टाकण्यास पाश्चात्य शिक्षणपद्धतीचा ख्रिस्ती मिशनऱ्यांनी ब्रह्मास्त्र म्हणून वापर केला. त्यात प्राचीन इतिहास, प्राचीन संस्कृती, प्राचीन शास्त्रपरंपरा व धर्म हे सारे हीन दर्जाचे आणि टाकाऊ असून **स्वयं केंद्रित युरोपियन अर्थप्रधान विज्ञानवाद हाच सर्व श्रेष्ठ आहे** अशा शिक्षणाचे बाळकडू आपणा सर्वांना प्राप्त झाले. यातून सुटण्यासाठी प्रथम आपल्या पूर्वजांचा इतिहासविषयक दृष्टिकोन समजून घेऊन प्राचीन आर्य संस्कृतीचे श्रेष्ठत्व, विश्वव्यापकत्व आणि जगद्गुरुत्व समजावून घेणे महत्वाचे आहे. या ठिकाणी आपल्याला केवळ पूर्वजांची स्तुती करावयाची नसून त्यापासून स्फूर्ती घ्यावयाची आहे आणि त्या स्फूर्तीतून सुशिक्षित- सुसंस्कारसंपन्न- इतर जगापेक्षा सर्व दृष्टीने प्रगत आणि एकात्म असे भारताचे मानचित्र नव्याने रंगवावयाचे आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि

आसामपासून सोमनाथापर्यंत भारतीय संस्कृतीच्या निरनिराळ्या रंगछटांनी एकात्म भारताचे ते उज्वल मानचित्र शोभायमान झाले पाहिजे, याच एका हेतूने विश्वव्यापी हिंदुसंस्कृतीचे विहंगम आलोडन करणे अगत्याचे आहे. त्यासाठी प्रथम प्राचीन आर्यांची इतिहासदृष्टी समजून घेण्याचा थोडक्यात प्रयत्न करू. हा विषय प्रचंड आहे आणि त्यासाठी सर्वांनीच सामूहिक प्रयत्न करणे जरूरीचे आहे. तसे केल्यानंतरच आपले ईप्सित साध्य होण्याजोगे आहे.

५.इतिहास दृष्टी

आर्यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन हाच श्रीगुलाबराव महाराजांचा दृष्टिकोन आहे व तो पाश्चात्यांपेक्षा वेगळा आहे. पाश्चात्यांना वाटते की प्रत्येक ऐतिहासिक घटना सांगोपांग जशीच्या तशी लिहिली गेली पाहिजे. ऐतिहासिक व्यक्तींनी ज्या बऱ्यावाईट गोष्टी केल्या त्या सर्व तपशीलवार पुढील पिढीला माहित झाल्या पाहिजेत.

दुसरे असे की युरोपातील लढायांचा व अत्याचारांचा क्रूर इतिहास, व्यभिचारी राण्या व राजांचा इतिहास; मुलाने बापाला, भावाने भावाला मारून राज्य बळकावल्याचा यावनी इतिहास; अशा प्रकारच्या खऱ्या पण अनैतिक इतिहासाचा अभ्यास करून समाजाला काय उपयोग होणार? याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

महाराजांनी शिक्षणाची व्याख्या **'सुसंस्कारांचे दान म्हणजे शिक्षण'** अशी केली आहे. त्या दृष्टीने पाहिले असता या अनैतिक इतिहासाचे यथासांग व तपशीलवार ज्ञान करून घेतल्याने नव्या पिढीवर कोणते चांगले संस्कार होणार आहेत? **उदा-** समजा आईकडून तारुण्यात चुक घडली तर ते ज्ञान करून घेतल्याने पुढील पिढी काय सुसंस्कारसंपन्न होणार आहे? अशा वाईट गोष्टी विसरून जाणे हेच व्यक्तिगत आणि एकात्म सामाजाच्या दृष्टीने हिताचे असते. म्हणूनच आर्यांच्या रामायण महाभारतादि इतिहासात व पुराणादिकात धर्माचरण करणाऱ्या पुरुषांचा विजय आणि अधर्मी

लोकांचा अधःपात आणि शेवटी नाश; हेच प्रामुख्याने लिहून ठेवण्यात आले आहेत.

''शेवटी सत्याचा विजय होतो'' म्हणून प्रत्येकाने कितीही कष्ट पडले तरी सत्याची कास सोडता कामा नये या शिकवणीसाठी इतिहासाचा अभ्यास हिंदू करीत असतात व तसे संस्कार नव्या पिढीवर व्हावे हीच हिंदूंच्या इतिहास लेखनाची संकेतरेखा आहे.

अधर्मेण एधते तावत् ततो भद्राणि पश्यति ।
सपत्नान् जयति, समूलं च विनश्यति ।।

हे सूत्र आर्यांच्या इतिहास लेखनात आढळते. चांगल्या इतिहासाच्या अभ्यासामुळे सुसंस्कार होऊन, समाजाचे स्थैर्य आणि मनःशांती कायम राहून भारतीय संस्कृतीला अभिप्रेत असलेली ऐहिक, नैतिक आणि शेवटी परमोच्च आध्यात्मिक प्रगती व्हावी यासाठी अशा इतिहासलेखनाला पंचम वेद मानले गेले आहे.

६.आय विट्नेसच्या मर्यादा

बरे, **''केवळ इतिहासासाठी इतिहास''** हाही पक्ष गृहीत धरला तरी खरा इतिहास लिहिला जाऊ

शकतो काय? याचाही विचार होणे आवश्यक आहे. पण तसे मुळीच आढळत नाही.

उदा.- एकच घटना चार लोकांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली तरी ते चारजण चार प्रकारची उलटसुलट माहिती ''आय विट्नेस'' म्हणून न्यायालयात साक्ष देतात. त्यापैकी एकच खरा असू शकतो व बाकीचे चुकीचे असतात, पण असे असूनही न्यायाधीश इतरांना खोटी साक्ष दिल्याबद्दल शिक्षा करीत नाही; कारण प्रत्यक्ष प्रसंग पहात असताना देखील स्वतःच्या मनोभूमिकेचा परिणाम होऊन नंतर त्या प्रसंगाचे आकलन प्रत्येकाला होत असते. म्हणूनच प्रत्येकाच्या ज्ञानात सत्य आणि असत्याचे मिश्रण असते. त्यामुळेच मित्रांनी लिहिलेला इतिहास व शत्रूंनी लिहिलेला इतिहास यात जमीन-अस्मानाचा फरक आढळतो. त्यावर विश्वास ठेवल्याने खरा इतिहास कधीही कळू शकत नाही.

याच कारणामुळे इतिहास लिहिण्याचे कार्य आर्यसंस्कृतीत सर्वज्ञ आणि निस्पृह अशा महात्म्यांकडे सोपविण्यात आले आहे. हिंदू लोक व्यासादिकांनी

लिहिलेल्या रामायण, महाभारत व पुराणे यांच्यावर विश्वास ठेवीत. त्यांनाच इतिहास म्हणून मान्यता देत. त्यामध्ये विश्वव्यापी आर्यसंस्कृतीचा हजारो वर्षांचा इतिहास अतिशय रंजक आणि उद्बोधक करून सांगितला गेला आहे. त्यात शेकडो राजांची केवळ नामावली आली आहे. त्यांचा तपशीलवार इतिहास जपून ठेवणे आणि या प्रचंड कालौघात क्रूर संहारक नरपशूंच्या यावनी आक्रमक विध्वंसातून त्या इतिहासग्रंथांना वाचविणे आपल्या पूर्वजांना अशक्य झाले. आणि याउपरही जरी नालंदा, तक्षशीला वगैरे सारख्या अनेक विश्वविद्यापीठातून त्यांचे रक्षण झाले असते तरी देखील त्या सर्वांचा सांगोपांग अभ्यास करणे अशक्यच होते.

आपल्या संस्कृतीत निस्पृह, सद्गुणसंपन्न आणि महात्मे यांनी लिहिलेल्या इतिहासाचा पुराणे म्हणून अभ्यास केला जाई. अवतारांची कृत्ये गायिली जात आणि शेवटी धर्म, नीती व ज्ञानभक्तीचे वर्धन करून प्रत्येक मनुष्याला परमार्थाच्या प्रवासाला उद्युक्त केले जाई. याप्रमाणे इतिहासाचा उपयोग देखील मानवाच्या

सर्वंकष उन्नतीसाठीच केला जावा अशी भारतीय संस्कृतीची भूमिका महाराजांनी मांडली आहे. श्री गुलाबराव महाराजांच्या साधुबोध ग्रंथातील आर्यविषयक आणि इतिहासविषयक प्रश्नोत्तरे, समयोपदेशातील प्रवचने व संप्रदायसुरतरूतील काही प्रकरणात हा भाग विस्तारपूर्वक आलेला आहे, त्यावरून महाराजांची इतिहासविषयक दृष्टी किती मूलगामी होती, हे दिसून येईल. **इतिहास शिकविण्याचे प्रयोजन काय? इतिहास कोणी लिहावा व कसा लिहावा?** या मूलभूत बाबींवरील महाराजांचे विचार अगदी स्पष्ट आणि परखड आहेत. त्यांचे दोन सिद्धान्त असे.

१ स्वोत्कर्षवर्धक इतिहास शिकविण्यात यावा.

२ आपल्या विश्वव्यापी आर्यसंस्कृतीची सर्वांगिण माहिती असावी.

या दोन महत्वाच्या संकेतांच्या अनुषंगाने आपण प्राचीन आर्यांची इतिहासविषयक दृष्टी आणि आधुनिक इतिहासलेखनपद्धती यांचा थोडक्यात परामर्श घेणे जरूर आहे.

७.ऐतिहासिक विकासवाद

प्रत्येक गोष्ट ऐतिहासिक दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ती महाराजांना मान्य नाही. ते म्हणतात की -

''ही सवय पाश्चात्य उत्क्रांतिवादाने लागली आहे. उत्क्रांतिवाद मान्य केला की जुने ते सर्व वाईट, असाच अभिप्राय निघतो. पण असे जर ठरले तर आपला एखाद्यावरील फार दिवसांचा स्नेह कुचकामाचा ठरणार. नवीन रोग उत्पन्न झाले तर ते सुधारलेले व जुनी निरोगी स्थिती वाईट ठरेल. नदीच्या उजळ पाण्यापेक्षा पुराने ओंगळ झालेले पाणीच पिण्याला चांगले समजावे लागेल.''

अशी उदाहरणे देऊन महाराज म्हणतात- ''ज्या गोष्टी नित्य आहेत अशा गोष्टींविषयी जुना इतिहासच खरा आहे आणि ज्या गोष्टी बदलणाऱ्या आहेत त्याविषयी पाहिजे असल्यास नवेपणाची घमेंड मारावी.''

ऐतिहासिक विकासवाद त्यांना मुळीच मान्य नाही. तसे मानल्यास, ''नेहमी विसदृश गोष्टीच घडत गेल्या पाहिजेत. जर सारख्या गोष्टी घडतील तर मागची

घटना कोणती व त्यानंतरची घटना कोणती, याचा ऐतिहासिक कालनिर्णयच होणार नाही.'' (उत्क्रांतिवादानुसार समजणार नाही.) कारण विश्वाचा प्रवाह सदृश आणि विसदृश घटनांनी बनलेला आहे.

सर्वथा वैसदृश्य कबूल केल्यावाचून कोणत्याही गोष्टीचा प्रारंभ व विकास मानणे शक्य नाही.

सादृश्याने आरंभाच्या पूर्वीही तसे असण्याचा संभव मानावा लागतो. (या संबंधीचे अधिक स्पष्टीकरण उत्क्रांतिवादाच्या समीक्षणात महाराजांनी केले आहे.) ''इतिहासाची पुनरावृत्ती होत असते'' हे इतिहासातील महत्वाचे तत्त्वच विकासवादाच्या विरोधी कसे आहे, याचेच जणुं महाराजांनी विवेचन केले आहे. ऐतिहासिक विकासवाद मान्य केला की एकसारखी घटना पुनः पुनः कधीच घडू शकत नाही. म्हणून ऐतिहासिक विकासवाद चुकीचा आहे, असे महाराजांच्या विवेचनावरून दिसून येईल.

८.इतिहास कोणी व कसा लिहावा?

''रागद्वेषामुळे ऐतिहासिक शोध बदलत असतात'', हे आपण नेहमीच पाहतो. याप्रमाणे इतिहासाचा सर्वत्र संशयच आहे तर कोणी लिहिलेल्या इतिहासावर विश्वास ठेवावा? या विषयीचे महाराजांचे विवेचन महत्वाचे आहे. ते म्हणतात-

''महात्म्यांनी लिहिलेल्या इतिहासावरच विश्वास ठेवावा. कारण वैयक्तिक उपपत्तीविषयी रागद्वेषामुळे ऐतिहासिक शोध बदलत असल्यामुळे रागद्वेषरहित अशा साधुपुरुषांनी लिहिलेले इतिहासच खरे समजून त्यानुसार बोध घ्यावा.''

कोणी म्हणतात स्तुती करणाऱ्यांपेक्षा निंदा करणाऱ्यांनी लिहिलेला इतिहास खरा असतो. पण हे मत महाराजांनी अगदी त्याज्य ठरविले आहे-

''जगात राग मात्र आहे व द्वेष असा काही नाही. शिवाय चुका सर्व प्रेमातच होतात, द्वेषात चुका मुळीच होत नाहीत - हा सिद्धांत गणितातल्या सिद्धांताप्रमाणे सत्य होईल त्या दिवशी या लोकांचेही

म्हणणे खरे होईल.''

''इतिहासात शत्रूच्या तोंडची स्तुती व मित्रांच्या तोंडची निंदा या मात्र नेहमी खऱ्या स्थितीच्या निदर्शक समजल्या जातात.''

म्हणून महाराजांनी असे मत मांडले आहे की ''इतिहास हा मोठ्या महात्म्यांनीच लिहावा, हे आर्य धर्माचे तत्त्वच बरोबर आहे.'' याचे कारण असे की आर्यधर्मात-

१. वचने.

२. आचरण.

३. आचरण करणारी मनुष्ये.

अशी त्रिपुटी अनादि मानलेली आहे व तिची धर्माला जरूरीही आहे.

१- श्रुती वचनप्रमाण आहे.

२- स्मृती आचरणप्रधान आहे.

३- पुराणात धर्माचरण करणाऱ्या मनुष्यांच्या कथा आहेत.

असा एकंदर धार्मिक क्रम आहे. आता इतिहास

जर सर्वज्ञप्रणीत नसेल तर 'कर्णाने प्रसंगी आपल्या आईचे ऐकले नाही' हा त्याने धर्म केला की अधर्म केला, इत्यादी गोष्टींचा निर्णय कोण आणि कसा करणार?

महाराज म्हणतात- ''खाण्यापिण्यापासून सर्व लहानमोठ्या व्यवहारात आम्हा आर्यांना धर्मावाचून दुसरे काही दिसत नाही. अलीकडच्या इतिहासात तिथीसुद्धा विश्वसनीय सापडत नाही तर मग धर्माचा लाभ त्यापासून काय होणार! म्हणून सर्वज्ञप्रणीत असे रामायण महाभारतच आम्ही इतिहास समजतो; आणि येवढ्याच करता साधूंनी लिहिलेले इतिहास आम्हाला प्रमाण वाटतात.''[४]

या संदर्भात आधुनिक युगातील इतिहासलेखनही पाहण्यासारखे आहे. आज विसाव्या शतकातील घडणाऱ्या महत्वाच्या घटना टेलिव्हिजनने त्याक्षणी पाहता येतात. ताज्या बातम्या काही तासातच रेडिओने ऐकावयास मिळतात आणि वर्तमानपत्रातून इत्थंभूत वाचावयास मिळतात. परंतु त्यात परस्पर विरोधही नेहमीच असतो.

प्रत्येकजण स्वतःचा स्वार्थ साधण्यात आणि शत्रूची हानी करण्यातच आधुनिक वैज्ञानिक प्रगतीचा उपयोग करीत असतो. निस्पृहता नांवालाही नसते. विज्ञानाची इतकी प्रगती होऊनही सत्य इतिहासाचा अपलाप आणि विकृतिकरण जाणूनबुजून होत असते. म्हणून हिंदुस्थान-पाकिस्तान युद्धात अमेरीकेत दूरदर्शनवर फिल्म दाखविल्या गेली की पाकिस्तान दिल्ली उध्वस्त करीत आहे, दिल्लीच्या इमारती कोसळत आहेत. असा सारा खोटा प्रकार असतो. भविष्यकाळात या खोट्या प्रमाणांच्या साह्याने कोणी इतिहास लिहला तर तो खरा समजावा काय?

९.इतिहासावर विश्वास?

यासंबंधी महाराजांचे मत असे आहे की एकमेकांचे शत्रू एकमेकांचे इतिहास दाबून टाकून मुद्दाम द्वेषपूर्ण चुकीचा इतिहास लिहीत असतात. त्यामुळे वाटेल त्याने लिहिलेल्या इतिहासावर खरा इतिहास म्हणून विश्वास ठेवणे योग्य नाही. या विवेचनावरून एकूण तीन मुद्दे लक्षात येतात.

१- दिव्यदृष्टी ज्याला आहे अशा साधुपुरुषांनी लिहिलेल्या इतिहासावर विश्वास ठेवावा.

२- दिव्यदृष्टीचा प्रयत्न नसेल किंवा दिव्यदृष्टीवर विश्वास नसेल तर **स्वोत्कर्षबोधक असलेल्या इतिहासावर विश्वास ठेवावा.** - याचे कारण असे की एकमेकांचे विरोधी एकमेकांच्या इतिहासाचा अपलाप करीत असतात.[५]

महाराजांनी केलेले प्रतिपादन - मेकॉले, मॅक्समूल्लर मॅकडोनल, व्हिलर, ग्रिफिथ, मार्शल वगैरेंनी लिहिलेल्या प्राचीन भारताच्या इतिहासावरून आणि आधुनिक वर्तमानपत्रातील लिखाणावरून उत्तम रीतीने सिद्ध होते.

परंतु **'शत्रूच्या तोंडची स्तुती'** ही या खऱ्या वस्तुस्थितीची निदर्शक असल्यामुळे त्यांचेवर खरा इतिहास म्हणून भरवंसा ठेवणे चांगले. त्यामुळे मॅक्समूलर, टॉड, मांगो पार्क, कौंट जार्नस्टजर्ना वगैरेंनी केलेली स्तुती अगदी खरी आहे असे समजून त्यातून बोध घेण्यास मुळीच हरकत नाही.

महाराजांच्या विवेचनावरून असे दिसते की

इतिहासाचा खरा शोध लावणे फार दुरापास्त आहे. ते जीवबुद्धीच्या आटोक्यात नाही. ते म्हणतात -

''प्रत्यक्ष लेखादिकांवरून जेवढा शोध लावला त्यावर कसातरी विश्वास ठेवावा पण त्यावरून एखादे अनुमान काढले की ते बहुतेक चुकीचे ठरते.''

पण त्यामुळे ऐतिहासिक प्रमाण पूर्णपणे नाहीसे होते असे नाही. प्रमाणाला सामान्य सत्ता अपेक्षित आहे. इतिहासाची सामान्यसत्ता कोणीही नाकबूल करीत नाही. परंतु जेथे विकारात्मक लेख दृष्टीस पडतात तेथे मात्र दिव्य दृष्टिवाचून कोणत्याही रीतीने इतिहास समजणे शक्य नाही. पण -

१- दिव्यदृष्टीचा आव आणून एखाद्याने तसा इतिहास लिहिला तर तो इतिहास आपल्याला आपल्या जागेहून ओढणारा असल्यास, आपल्यातील दिव्यदृष्टी पुरुषांचा शोध करून किंवा आपण ती दिव्य दृष्टी संपादन करून, खरे-खोटेपणाचा निवाडा करून घ्यावा.

२- असे पाहण्यात जर आपल्यामध्ये शक्ती नसेल तर दुसऱ्याच्या दिव्य दृष्टीवर विश्वासू नये व तो इतिहासही

खरा मानू नये.

३- **लिखित इतिहास जर स्वोत्कर्षबोधक असेल तर तो कोणीही सांगितलेला असला तरी खुशाल विश्वास ठेवावा.** तसेच -

४- विकाररहित व अनिच्छित असेल तरीही विश्वास ठेवावा.

१०.इतिहासाचे ३ प्रकार

आपल्या पूर्वजांनी लिहिलेल्या इतिहासाचे तीन प्रकार आहेत.

(१) **केवळ व्यक्तिनिष्ठ इतिहास** म्हणजे राजतरंगिणी. विजयविलास, रासमाला, बखरी वगैरे सारखे २-४ हजार वर्षातले इतिहास आणि -

(२) **पारमेश्वरीय इतिहास** - दुसरा प्रकार म्हणजे रामायण- महाभारत- हरिवंश- पुराणे- बुद्धचरित्र- महावीरचरित्र वगैरेतून मनोवेधक रीतीने सांगितलेला व्यक्तिनिष्ठ, तात्त्विक आणि **पारमेश्वरीय इतिहास.** - यातून महापुरुष, महात्मे, राजे यांच्या वंशावळी मिळतात आणि त्यांच्या कथानकांद्वारा सत्त्वगुणबोधक शिक्षणही

मिळते. **''सुसंस्कारांचे दान म्हणजे शिक्षण''** या श्रीगुलाबराव महाराजांच्या व्याख्येनुसार, समाजातील सर्व थरातील लोकांची सत्त्ववृद्धी करण्यासाठी- त्यांना सुसंस्कार संपन्न करण्यासाठी सर्व ऐतिहासिक प्रसंगांची मांडणी रंजक रीतीने केलेली आहे.

(३) **तात्त्विक इतिहास** - पुराणादिकात निसर्गातील वृक्ष व प्राणी यांच्याही कथा आल्या आहेत. त्यांचाही उपयोग शिक्षणाकडेच होतो. त्यांना मात्र श्री गुलाबराव महाराजांनी **'तात्त्विक इतिहास'** म्हणून संबोधिले आहे. आणि त्यांचा अभ्यास करण्यासाठी काही वेगळे निकष सांगितले आहेत.

''खरा इतिहास कोणता? आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा? वगैरे व्यक्तिनिष्ठ इतिहाससंबंधीचे नियम आणि इतिहासाचा संदिग्धपणा'' - पुराणादि जे तात्त्विक इतिहास आहेत त्यांना लागू होत नाहीत हे त्यांनी युक्तिवादपूर्वक दाखवून दिले आहे.

व्यक्तींच्या इतिहासाला मात्र वरील नियम लागू

होतात. पुराणादिकांना महाराजांनी तात्त्विक आणि परमेश्वरीय इतिहास म्हटले असून त्यावर **'पुराण मीमांसा'** नामक संस्कृत सूत्रग्रंथ लिहून पुराणांची सामान्यसत्ता प्रतिपादन केली आहे. त्यामुळे पुराणादिकांतील किंवा महाभारतातील कोल्ह्याकुत्र्यांच्या गोष्टी देखील सामान्य दृष्टीने खऱ्या मानल्या आहेत. पण त्यांत स्थलकालाचा संयोग सापडत नाही व इतिहासात तो सापडतो एवढाच दोहोत फरक आहे. म्हणून ''त्यावरही विश्वास ठेवावा'' असे महाराजांनी आपले मत मांडले आहे. [७]

या मताचे पुष्टीकरण वेदान्तातील दृष्टिसृष्टि-वादानुसार आणि परमेश्वराच्या किंवा ऋषीमुनींच्या सत्यसंकल्पत्वाच्या सिद्धान्तानुसार केले आहे. एकूण काय तर सर्व समाजावर सुसंस्कार करण्यासाठी तात्त्विक इतिहासाचा आणि परमेश्वरीय इतिहासाचा आपल्या देशात आजपावेतो उपयोग होत होता व पुढे भविष्यातही निश्चित होणार !

आपल्या संस्कृतीत पूर्वी विद्याभ्यास म्हणजे एक तपच होते. त्यामुळे गुरुकुलात जाऊन शास्त्राभ्यास

करणारे लोक फार कमी होते. सामान्य माणूस आपला परंपरागत व्यवसाय शिकत असे आणि उपजीविका करीत असे. अशा समाजावर धर्म नीती वगैरेचे सुसंस्कार करण्याचे कार्य पुराणिक, कीर्तनकार वगैरे करीत. गावागावातील मंदिरात रात्रौ प्रवचने असत. पुराणकथा विस्ताराने सांगितल्या जात आणि कीर्तने होत. या कीर्तनात संगीत, नाट्यमयता आणि उद्‌बोधन सारेच काही असल्यामुळे मनोरंजन, व्यावहारिक नीती, धर्म, वेदान्त, भक्ती इ.चे संस्कार म्हणजे सुशिक्षण, समाजातील सर्व थरांना मिळत असे. त्यामुळेच आपली हिंदू संस्कृती हजारो वर्षापासून नीतिमान् आहे- सत्त्वप्रवृत्त आहे, धार्मिक आहे आणि जगातील केवळ मानवांचेच नव्हे तर निसर्गातील सर्व जन्तुमात्राचेही कल्याण इच्छिणारी आहे.

मुसलमानांचे हजार पंधराशे वर्षे राज्य असूनही हिंदूंचे भावविश्व कधी उध्वस्त झाले नाही. विद्याव्यासंग कमी झाला नाही. चांगल्याला चांगला म्हणून स्वीकारण्याची प्रवृत्ती नष्ट झाली नाही. त्यागाला

लोकमानसात सन्मान होता. स्वार्थ प्रत्येकालाच हवा असतो तरीही धर्मनीतीच्या सिंहासनावर त्यागच अधिष्ठित होता. आणि हे सारे टिकून राहण्यासाठी तात्त्विक आणि परमेश्वरीय इतिहास कीर्तन प्रवचन पुराणादिकातून - मोलमजुरी करणाऱ्यापासून विद्याव्यासंगात मग्न असणाऱ्यापर्यंत - सर्वच समाजाला शिकविला जाई. त्यामुळे समाजमानसावर सुसंस्कार होऊन हिंदूंची समाजव्यवस्था चांगल्या रीतीने टिकून राहिली. कांही अपवाद आणि थोडेफार दोष कोणत्याही पद्धतीने निर्माण होतातच, परंतु त्यातल्या त्यात

* कमी दोष असलेली,
* सद्‌गुणांचा विकास करणारी,
* समाजातील प्रत्येक घटकाला सत्प्रवृत्त करणारी जीवनपद्धती, हिंदुंचीच आहे.

हे आता जडवादी पाश्चात्य विद्वानही स्वीकारू लागले आहेत. यातच **हिंदु संस्कृतीची नित्यनूतनता** आहे.

११.इतिहासाच्या-मर्यादा

इतिहासाचा अभ्यास करताना इतिहासाच्या मर्यादाही लक्षात ठेवणे आवश्यक आहे असे महाराजांना वाटते. त्यांनी इतिहासाच्या मर्यादेसंबंधी एक महत्वाचा विचार मांडला आहे. इतर ठिकाणी इतिहासविषयक सूक्ष्म विवेचन करून इतिहासाचे श्रेष्ठत्व जसे प्रतिपादन केले आहे तसे त्यातील उणीवाही मोजक्या शब्दात त्यांनी दाखविल्या आहेत.

प्रश्न - शास्त्र येत असूनही त्यातील रहस्य कोणाला समजत नाही?(८)

उत्तर - त्यातील भाषेवर किंवा इतिहासावर ज्याचा भर असतो त्याला !

हे साधुबोधातील मार्मिक उत्तर पाहून महाराजांच्या नीरक्षीर विवेकाची कल्पना येते. इतिहास हुडकून काढण्यासाठी विद्वान लोक पुराणांचा अभ्यास करतात, रामायण महाभारताचा अभ्यास करतात, गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध वगैरे उत्तमोत्तम ग्रंथांचा अभ्यास करतात पण लक्ष ठेवतात केवळ त्यातील इतिहासाकडे किंवा भाषेकडे!

त्यामुळे स्वतः अभ्यासू असूनही ग्रंथकाराचे हृद्‌गत ते ओळखू शकत नाहीत. म्हणून इतिहासाचा अभ्यास करताना इतिहासाच्या मर्यादा लक्षात ठेवणे आवश्यक आहे असे महाराजांना वाटते.

१२.'आर्य' अर्थाची तोडफोड

इतिहास-लेखनासंबंधी आर्यांनी जोपासलेल्या, प्राचीन संकेतांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे भारतीय इतिहासाचा अभ्यास करताना बरेच अपसमज निर्माण झाले. तसेच, भारतावर आक्रमण करणाऱ्यांनी स्वतःचा धर्म आणि राज्य वाढविण्यासाठी दूरगामी परिणाम होतील अशा शैक्षणिक योजना आखल्या. आपल्या भारतीय इतिहासाची विकृती जाणीवपूर्वक करण्यात आली. त्याचे दुष्परिणाम आज आपल्या हिंदुसमाजाला भोगावे लागत आहेत. म्हणून-

१. 'आर्य' या शब्दाचा अर्थ.
२. 'आर्यांचे गमनागमन' यासबंधीचे तथाकथित मतवाद.
३. 'आर्यसंस्कृतीची विश्वव्यापकता.'

या संबंधी पुनर्विचार करून खऱ्या सत्याचा शोध घेणे, ही भारतीय इतिहासाची मूलभूत गरज आहे.

१३.आर्य = सुसंस्कृत मानव

आर्यसंस्कृतीचा विचार करताना प्रथम, 'आर्य' या शब्दाचा अर्थ काय आहे आणि तो काय केला जातो, हे पाहिले पाहिजे. वेद, पुराणे, स्मृती, बौद्ध, जैन व महाकाव्यादि सर्व संस्कृतवाङ्मयातून किंवा भारतातील पाली प्राकृत भाषातून आर्य, दस्यू आणि दास हे शब्द आलेले आहेत. आर्य शब्दाची स्मृतींमधील व्याख्या पाहिली असता आर्य शब्द वैदिक व संस्कृतात कोणत्या अर्थाने वापरण्यात येत होता आणि येत असतो, ते अगदी स्पष्ट कळून येईल -

कर्तव्यमाचरन् कार्यं अकर्तव्यं अनाचरन् ।
तिष्ठति प्रकृताचारे स वै आर्य इति स्मृतः ।। [९]

'ऋ' धातू **गतिवाचक** आणि **ज्ञानार्थी** आहे म्हणून आर्य म्हणजे ज्ञानसंपन्न, पूज्य, श्रेष्ठ, असा अर्थ आहे.

कर्तव्याचे आचरण करणारा,

निषेधाला टाळणारा,
धर्माचरण करणारा,

अज्ञानांधःकारातून ज्ञानाकडे जाणारा म्हणजे आर्य, असा श्लोकार्थ आहे.- **तमसो मा ज्योतिर्गमय ।**

१. आर्य म्हणजे **यजनशील वर्ग** म्हणजे यज्ञ करणारे लोक किंवा **शिष्ट** असाही अर्थ वेदात प्रचारात आहे.

२. संस्कृत भाषेत **पती**ला आर्य किंवा आर्यपुत्र वगैरेंनी संबोधतात हे सर्वांना माहितच आहे.

३. **कोणताहि सन्माननीय गृहस्थ** वयोवृद्ध असेल किंवा शूद्र जातीचा जरी असेल तरी त्याला 'आर्य' म्हणून व्यवहारात आणि नाटकादिकातही संबोधिले जाई.

याप्रमाणे आर्यशब्दाचा **गुणवाचक अर्थ** वैदिक, संस्कृत व सर्व भारतीय वाङ्मयात सर्वत्र आलेला आहे. **एकाही ठिकाणी वंशवाचक अर्थ चिटकविलेला नाही हे विशेष आहे.** असे असूनही **मॅक्समूलरने** आर्य शब्दाचा ''वंश'' असा अर्थ मानला व **लो.**

टिळकांनीही त्याला प्रमाण मानून आर्य वंशाची एक शाखा उत्तर ध्रुवावरून भारतात आली, असे प्रतिपादन केले. - परंतु आर्य शब्दाचा विचार करतांना महाराष्ट्रीय ज्ञानकोशात **डॉ. केतकरांनी** चार कसोट्या मांडल्या आहेत[१०] त्या फारच महत्वाच्या आहेत.

१४.चार कसोट्या

आर्य शब्दाला वंशवाचक ठरवावयाचे असेल तर-

१) 'आर्य व दस्यु' या शब्दांचा पारमार्थिक अर्थ असलेले उतारे उपयोगाचे नाहीत.

२) 'आर्य' या शब्दाचा 'समाजातील शिष्ट वर्ग'हा अर्थ असलेले उतारे उपयोगाचे नाहीत.

३) जेथे आर्यास 'वर्ण' म्हटले असेल व जेथे 'वर्ण' या शब्दाचा 'वर्ग वाचक' अर्थ असण्याची शक्यता असेल तर ते उल्लेख उपयोगाचे नाहीत.

४) 'दस्यूंचा संहार' या प्रकारच्या विधानांमध्ये रूपकाची भाषा असता कामा नये.

(महाराष्ट्रीय ज्ञानकोश - डॉ. केतकर, खंड १)

या कसोट्यानुसार वैदिक वाङ्मयात असलेले

आर्य शब्दाचे सर्व उल्लेख तपासून पाहिले तर आर्य, दस्यु व दास हे शब्द एकाही ठिकाणी वंशवाचक आढळत नाही. उलट दस्यु हे आर्य वंशाचे शत्रू होते असे म्हणावे तर ऋग्वेद व अथर्ववेदामध्ये सूक्तकारांनी आर्य व दस्यु या दोघांचाही शत्रू म्हणून उल्लेख केला आहे व त्यांना जिंकण्याची इच्छा व्यक्त केली आहे. [११] आणि **दस्यूला आर्य करण्याची शक्ती दे.** अशा प्रार्थना केल्या आहेत.

१५.दास आर्य होत असत

१. यस्ते मन्योऽ विधद् वज्रसायक सहः ओजः पुष्यति विश्वमानुषक् ।। सह्याम दासमार्यं त्वया युजा (वयं) सहस्कृतेन सहसा सहस्वता ।।
ऋग्वेद १०-८३-१ । अथर्व ४-३२-१ ।।

अर्थ - हे मन्यो, जो तुझी आराधना करतो त्याला तू विजयी शक्ती देतोस. तुझ्या साह्याने आम्ही 'आर्य व दस्यु' या आमच्या दोघाही शत्रूंना जिंकू.

आसमंतमिंद्रणः स्वस्ति शत्रुतूर्याय बृहतीममृध्राम् ।यथा दासान्यार्याणि वृत्रा करो वज्रिन् सुतुकानाहुषाणि ।।

अर्थ - हे इंद्रा, तूं आम्हाला शत्रुनाशासाठी पुष्कळ व न संपणारी अशी शाश्वत संपत्ती दे. तिच्या योगाने दास आर्य होतील व शत्रू मारले जातील (दास आर्य होऊ शकतात.)

हे इंद्रा, आम्हाला अशी प्रतिभा दे की जीमुळे **दस्यु देखील आर्य होतील** आणि मानवाचे सर्व शत्रू नष्ट होतील. (ऋग्वेद ६।२२।१०)

३. यो नो दास आर्यो वा पुरुष्टुतादेव इंद्र युधये चिकेतति ।। अस्माभिष्टे सुषुहाः सन्तु शत्रवस्त्या वयं तान्वनुयाम संगमे ।। ऋग्वेद १०-३८-३

अर्थ - हे बहुस्तुत इंद्रा, जे अधार्मिक आर्य किंवा दास आमच्याशी युद्ध करतील ते आमचे शत्रू तुझ्या प्रसादाने, जिंकण्यास सुलभ होवोत.तुझ्या साह्याने आम्ही त्यांना युद्धात मारू.

४. हतो वृत्राण्यार्याहतो दासानि सत्पती । हतो विश्वा अप द्विषः।। ऋग्वेद ६-६०-६

अर्थ - हे सत्पालक इंद्राग्नी आम्हाला उपरोध करणाऱ्या आर्यांना व दासांना मारतात. व आमच्या

सर्व शत्रूंचा नाश करतात. यातील आर्यवृत्र म्हणजे आर्यरूपी शत्रू, हा सायणाचार्याचा अर्थ ग्रिफितनेही मान्य केला आहे. - (वेदातील राष्ट्रदर्शन. बाळशास्त्री हरदास. पा. ७०-७३.)

१६ काळे आर्य

तसेच **आर्य फक्त गौरवर्णीच होते, या म्हणण्यातही काही अर्थ नाही.** कण्वऋषी काळे होते. इंद्र श्यामवर्णी होता. राम, कृष्ण, व्यास वगैरे देखील कृष्णवर्णी असून त्यांना कोठेही अनार्य म्हटलेले नाही. याप्रमाणे प्राचीन वाङ्मयात आर्य, दस्यु व दास हे शब्द गुणवाचक वापरीत असत. वंशवाचक नव्हेत !

१७.शूद्रांना ऋषित्वाची प्राप्ती

''कवष ऐलूष'' हे दासीपुत्र असूनही त्यांची विद्वत्ता पाहून त्यांस ऋषींनी आपणात समाविष्ट करून घेतले. मूळचे दास असूनही ऋग्वेदाच्या काही मंत्रांचे ते द्रष्टे-ऋषी झाले. (ऐतरेय ब्राह्मण)

तसेच **सत्यकामजाबाल** हेही यजुर्वेदाच्या एका शाखेचे प्रवर्तक ऋषी होते [१३] (छान्दोग्य उपनिषद्)

याप्रमाणे शूद्र पुरुष **ब्राह्मणऋषी** होऊ शकत असे, हे वैदिक वाङ्मयावरून स्पष्ट होते.

श्री गुलाबराव महाराजांनी देखील या मताचा विस्ताराने परामर्श घेतला आहे. पुरुषसूक्त, महाभारतात व मनुस्मृती वगैरेचे आधार देऊन शूद्रवर्ण हा आर्याचाच एक भेद आहे हे दाखवून दिले आहे. [१२]

१८.देशक्षोभकारक उपपत्ती

आर्य लोक बाहेरून भारतात आले व येथील लोकांना जिंकून त्यांना दस्यु म्हणजे दास म्हणजे शूद्र केले म्हणून जातिव्यवस्था हा धर्मजुलूम होय - या आरोपावर महाराजांनी स्वतः रोखठोक उत्तर दिले आहे. श्रीमहाराज स्वतः जन्माने कुणबी असूनही त्यांच्या मनात ब्राह्मणांविषयी किंतु देखील येत नाही. ते म्हणतात-

''आर्य लोक बाहेरून आले ही उपपत्ती अलिकडेच निघाली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य हे तीन वर्ण आर्यांचे असून शूद्रवर्ण हा देखील मूळच्या दस्यू लोकांचा आहे, ही उपपत्ती मानणारे लो.टिळक-देशाचे पुढारी. परंतु या उपपत्तीमुळे-

१- शूद्रांचा व ब्राह्मणांचा कायमचा द्वेष राहण्याची पाळी आलेली आहे.

२- 'आर्यांनी आम्हाला कायमचेच गुलाम करून घेतले' असा समज, या उपपत्तीमुळे शूद्रांच्या मनातून कधीही नष्ट होणे शक्य नाही.

३- कितीही सवलती दिल्या तरी कायमचा कलह राहतो. शिवाय -

४- 'आम्हाला गुलाम करण्याकरिताच वेदांचा अधिकार दिला नाही,' ही समजूत या उपपत्तीमुळे दृढ होण्याचा संभव आहे.''

पुढे महाराज म्हणतात, **''शूद्रवर्ण हा आर्यांपैकी नाही हे म्हणणे देशक्षोभकारक आहे.''**

''ही आर्यांच्या बाहेरून आगमनाची उपपत्ती व्यर्थ भेदकारक असल्यामुळे मान्य करता येत नाही.''

लोकमान्य टिळकांच्या मतासंबंधी बोलतांना महाराजांनी स्वतःकडे कमीपणा घेऊन पण कोणतीही भीती न बाळगता, आत्मविश्वासाने स्पष्ट विवेचन केलेले आहे-

''आर्य बाहेरून आले या उपपत्तीचे उत्पादक राष्ट्रीय पक्षामुळे लोकांना मान्य (लोकमान्य) झाले आहेत. म्हणून त्यांच्यावर टीका करणाऱ्या माझा बहुजन उपहास करणार आहेत, हे मी जाणून आहे. पण धार्मिक दृष्टीने माझे म्हणणे बरोबर आहे, हेही मी जाणून असल्यामुळे बहुजनमताला मी भीत नाही.''(१८)

१९.पूर्वी सर्वच आर्य होते

या विवेचनाला महाराजांनी महाभारतातील शांतिपर्वातील श्लोक प्रमाण घेतले आहेत. पूर्वी सर्वच आर्य होते पण क्रियालोप झाल्याने भारत सोडून बाहेरच्या जगातील सर्व आर्य समाज वृषलत्वाला प्राप्त झालेत. त्यातही पुनः धर्माचरण करणारी आदर्शभूत अशी एकही व्यक्ती दृष्टीस पडेनाशी झाली. इतका भयानक संस्कारलोप झाल्यामुळे पौंड्रक, यवन, शक, किरात, खश, चिनी वगैरे मूळच्या क्षत्रिय जाती म्लेच्छ झाल्या.

(आजही क्रियालोप, संस्कारलोप झपाट्याने होत आहे, भारतीय लोकांचा धर्म सुटत आहे, हे आपण पाहतोच आहोत.)

यावरून असे स्पष्ट आढळून येते की **जगातील सर्व य□यावत् म्लेच्छ जाती देखील मूळच्या आर्यच होत्या पण कर्मत्यागामुळे म्लेच्छत्वाला प्राप्त झाल्यात.**

याप्रमाणे महाराजांनी जगातील सर्व जाती-जमातींचे मूळ एकच मानले आहे. त्यांना कोणतेही लोक परके वाटत नाहीत. प्रथम सर्व लोक एकाच ईश्वराने निर्माण केल्यामुळे एकाच वर्णाचे होते- पुढे विकार प्राबल्यामुळे चार वर्ण झाले- नंतर यवनम्लेच्छादि हजारो जाती उत्पन्न झाल्या. हा सर्व धर्माचरण सोडल्याचा परिणाम आहे; असे महाराजांनी स्पष्ट मानले आहे. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे आर्यधर्मातील सर्वोच्च पारमार्थिक सिद्धान्त जगातील सर्व लोकांना शिकविण्यास महाराजांना मुळीच प्रत्यवाय वाटत नाही. (१९)

एकूण काय तर, वैदिक आणि संस्कृत वाङ्मयाच्या आधारावरून आर्य शब्द हा गुणवाचक आहे असेच दिसून येते. **''आर्य म्हणजे सुसंस्कारसंपन्न आणि धर्माचरण करणारा मनुष्य''** असाच अर्थ महाराजांनी तर्क निकषावर प्रमाणांच्या साह्याने मांडलेला आहे.

तसेच दस्यु आणि दास हेही शब्द गुणवाचकच आहेत. त्यामुळे आर्यांच्या वाङ्मयातील अन्तर्गत पुराव्यावरून आर्य शब्दावर वंश या अर्थाचा खोटा आरोप करण्याचे कोणालाही काहीही प्रयोजन नाही.

२०.खरा अनार्य

आर्य-अनार्य, दस्यु-दास, या संज्ञा सदाचरण व असदाचरण यांना अनुलक्षूनच संस्कृतात सर्वत्र दिल्या गेल्या आहेत. किंवा दुर्जनतोष न्यायाने अनार्य शब्द एका शूद्र जातीचाच वाचक आहे असे कोणाचे म्हणणे असेल तर- **कै. श्री बाबाजी महाराज पंडित** आर्यधर्मोपत्तीत (पा.५४२) त्याला परखड शब्दात उत्तर देतात की-

* हिंदुधर्माचा घटकावयव असलेल्या शूद्र जातीचाच अनार्य कोटीत अन्तर्भाव करणारा
* हिंदुसमाजात कलहाग्नी पेटविणारा
* स्वतःस मात्र आर्यांचे वंशज ठरविणारा
* पण आर्य धर्मांचा अंगिकार न करणारा
* असा पाश्चात्य म्लेच्छ समाज हाच अनार्य संज्ञेस

पात्र आहे, हे महाभारत व मनुवचनावरून उघड होते.

* आर्यांना अनार्य ठरविणे व आपण स्वतः अनार्य असून स्वतःला आर्य म्हणणे हेच अनार्याचे (असंस्कृत माणसाचे) मुख्य लक्षण आहे.